3-245

दै. पुढारी २०/१२/०९

# नॅक मूल्यांकनाबाबत दोन दिवसांचे चर्चासत्र

**कोल्हापूर** : महाविद्यालय व विद्यापीठाचे मूल्यांकन होत असताना त्यामध्ये नॅक समितीने अनेक आमूलाग्र बदल केले आहेत. या बदलांची माहिती सर्व महाविद्यालयांना व्हावी यासाठी कमला महाविद्यालयाच्या वतीने २ व ३ फेब्रुवारीस दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी ते म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने राष्ट्रीय मूल्यमापन आणि मूल्यांकनाची स्थापना झाली. नॅकद्वारे शैक्षणिक संस्था, महाविद्यालय यांचे मूल्यांकन करून त्यांना दर्जा दिला जातो. यासाठी प्रथम तारांकित पद्धत नंतर श्रेणीपद्धतीचा अवलंब करण्यात आला. आता ही श्रेणी पद्धत बंद करण्यात आली आहे. त्याऐवजी ए,बी,सी,डी या प्रकारच्या श्रेणी देण्यात येणार आहेत.

जुन्या मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन पद्धतीनुसार १४० विद्यापीठे व ३५९१ महाविद्यालयांचे मूल्यांकन झाले आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक म्हणजे १७ विद्यापीठे व ९४९ महाविद्यालयांचे मूल्यांकन झाले आहे. नव्या मूल्यांकन पद्धतीनुसार ५ विद्यापीठांचे पुनर्मूल्यांकन व १०७ महाविद्यालयांचे मूल्यांकन झाले आहे. १४ महाविद्यालयांचे पुनर्मूल्यांकन झाले आहे.

आता नव्याने होणाऱ्या मूल्यांकनाची माहिती अनेक महाविद्यालयांना मिळलेली नाही. अनेक महाविद्यालयांना या नवीन पद्धतीच्या मूल्यांकनाने नॅक समितीला समोरे जावे लागणार आहे. त्यामुळे नेमके कोणते बदल झाले आहेत याची माहिती होण्यासाठी या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. कमला महाविद्यालय येथे २ फेब्रुवारीस सकाळी १० वाजता या चर्चासत्राचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजन वेळुकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे, माजी कुलगुरु डॉ. रा. कृ. कणबरकर, डॉ. एम. आर. कुरुप, डॉ. शरद अदवंत, एस. ए. देव आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. तरी या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पाटील यांनी केले.